आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.०० वाजता

१८ डिसेंबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबतच्या विधानावरुन गदारोळ झाल्याने आज संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- विधानपरिषदेच्या सभापतीपदासाठी महायुतीचे उमेदवार राम शिंदे यांचा एकमेव अर्ज दाखल

- बॉर्डर - गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला ब्रिस्बेन इथं झालेला तिसरा कसोटी सामना अनिर्णित

- भारताचा अष्टपैलू क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विनची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा

**आणि**

- 'लापता लेडीज' हा चित्रपट ऑस्कर पुरस्काराच्या शर्यतीतून बाहेर

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबतच्या विधानावरुन गदारोळ झाल्याने आज संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आधी दुपारी २ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल राज्यसभेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याचा आरोप करत लोकसभेत विरोधी पक्ष सदस्यांनी आज प्रचंड गदारोळ केला. सभागृहाचं कामकाज सुरु झाल्यावर लगेचच काँग्रेस, द्रमुक आणि

डाव्या पक्षाच्या सदस्यांनी शहा यांचा निषेध करणाऱ्या घोषणा द्यायला सुरुवात केली.

संसदीय कार्य राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल आणि सत्ताधारी सदस्यांनी त्याला हरकत घेतली. उलट काँग्रेसनेच कायम बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान केला असा आरोप मेघवाल यांनी केला. केवळ राजनैतिक गरज म्हणून काँग्रेसला डॉ. आंबेडकरांबद्दल आदर व्यक्त करावा लागला असं ते म्हणाले. दोन्ही बाजूंनी घोषणा सुरु राहिल्याने सभापती ओम बिरला यांनी दोन वाजेपर्यंत कामकाज स्थगित केलं. नंतरही गदारोळ चालूच राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राज्यसभेतही काँग्रेस, द्रमुक, राजद, आमआदमी पार्टी आणि इतर विरोधी सदस्यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या विधानाचा निषेध करणाऱ्या घोषणा दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वांसाठीच अतिशय आदरणीय आहेत असं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी सांगितलं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की काल अमित शहा डॉ. आंबेडकरांबाबत अतीव आदरानेच बोलले होते. मात्र काँग्रेसने डॉ आंबेडकरांच्या हयातीत आणि नंतरही त्यांची अवहेलना केली, लोकसभा निवडणुकीत त्यांना पराभूत करण्याचं कारस्थान केलं असा आरोप त्यांनी केला. काँग्रेसने केवळ मतपेढीच्या राजकारणासाठी बाबासाहेबांच्या नावाचा वापर केला असं ते म्हणाले. गदारोळ चालूच राहिल्याने अध्यक्ष जगदीप धनखड यांनी दुपारी २ वाजेपर्यंत कामकाज स्थगित केलं. नंतरही गदारोळ चालूच राहीला आणि कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

**<><><><><>**

काँग्रेसने आतापर्यंत डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा अनेकदा अपमान केला असून आपली कृत्यं काँग्रेसला आता लपवता येणार नाहीत असं प्रधानमंत्री नरेंद्र

मोदी यांनी म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या डॉ. आंबेडकरांबाबतच्या विधानावरुन आज संसदेत गदारोळ झाला त्या संदर्भात त्यांनी समाजमाध्यमावर प्रतिक्रीया दिली आहे. काँग्रेस सत्तेवर असताना दलित समुदायातल्या अनेकांची हत्या झाली असा आरोप त्यांनी केला असून अनुसूचित जाती जमातींसाठी काँग्रेसने काहीही केलं नाही असंही मोदी यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्य विधान परिषदेच्या सभापती पदासाठी महायुतीच्या वतीनं राम शिंदे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील, उदय सामंत आणि जयकुमार रावल हे मान्यवर नेतेही उपस्थित होते. महाविकास आघाडीनं मात्र अद्याप कोणत्याही उमेदवाराच्या नावाची घोषणा केलेली नाही. तसंच दुपारी १२ वाजेपर्यंत अन्य उमेदवाराचा अर्ज दाखल झाला नसल्यानं राम शिंदे यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.

**<><><><><>**

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या तिसऱ्या दिवशी विधानसभेचं कामकाज सुरू झाल्यावर औचित्याचे मुद्दे चर्चेसाठी घेण्यात आले. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल राज्यसभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केलेल्या वक्तव्याचा मुद्दा आज विधानसभेत काँग्रेसचे नितिन राऊत यांनी उपस्थित केला. मंत्री आशीष शेलार यांनी त्याला हरकत घेऊन राज्यसभेतले विषय या सभागृहात घेता येणार नाही, असं सांगितलं.

मुंबईत झालेल्या विशेष अधिवेशनात राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबाबतची चर्चा विधानपरिषदेत पुढे सुरू झाली. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या राज्यसभेतल्या वक्तव्याचा मुद्दा

विधानपरिषदेत उपस्थित करण्याचा प्रयत्न केला, मात्र उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्यासह सत्ताधारी सदस्यांनी यावर आक्षेप घेतला. यावर विरोधकांनी घोषणाबाजी करत सभात्याग केला. दरम्यान, विधानपरिषदेत आज विविध विधेयकं संमत करण्यात आली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे सुधारणा विधेयकं, तसंच जिल्हा परीषद आणि पंचायत समिती निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्यासाठीचं विधेयक, यांचा त्यात समावेश होता. दरम्यान, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करून विरोधकांनी आज विधानभवन परिसरात निदर्शनं केली.

<><><><>

विधीमंडळाचं कामकाज सुरू होण्यापूर्वी विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विधानभवन परिसरात आंदोलन केलं. वाईट परिस्थितीमुळं शेतकरी आत्महत्या करत आहेत. सोयाबीन, कापसाला योग्य भाव नाही, धानाला बोनस नाही. त्यामुळं सरकारनं शेतकऱ्यांवरचा अन्याय दूर करावा, अशी मागणी विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली.

<><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर - गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला ब्रिस्बेन इथं झालेला तिसरा कसोटी सामना अनिर्णित राहिला. आज सामन्याच्या अखेरच्या दिवशी भारताचा पहिला डाव कालच्या धावसंख्येत ८ धावांची भर घालून २६० धावांवर आटोपला. त्यानंतर ऑस्ट्रेलियानं दुसऱ्या डावात वेगानं धावा करत ७ बाद ८९ धावा झाल्या असताना डाव घोषित केला, आणि पहिल्या डावातल्या १८५ धावांच्या आघाडीसह भारतासमोर विजयासाठी २७५ धावांचं आव्हान ठेवलं. मात्र भारताच्या दुसऱ्या डावात केवळ २ षटकं आणि १ चेंडूचा खेळ झाल्यावर पंचांनी अपूऱ्या प्रकाशामुळे खेळ थांबवला. त्यानंतर पावसानं

हजेरी लावल्यानं खेळ पुन्हा सुरू होऊ शकला नाही. अखेरीस सामना अनिर्णित राहिल्याचं घोषित केलं गेलं. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात १५० धावा करणारा ट्रॅव्हिस हेड याला सामनावीराच्या किताबानं गौरवलं गेलं. या मालिकेतला चौथा सामना, येत्या २६ डिसेंबरपासून मेलबर्न इथं सुरू होणार आहे. आत्तापर्यंत झालेल्या तीन सामन्यांमध्ये दोन्ही संघांनी प्रत्येकी एका सामन्यात विजय मिळवल्यानं, मालिका १-१ अशी बरोबरीत आहे.

**<><><><>**

भारताचा अष्टपैलू क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विन यानं आज ३८व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेत असल्याची घोषणा केली. ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला तिसरा कसोटी सामना अनिर्णित राहिल्यानंतर त्यानं आपण निवृत्त होत असल्याचं जाहीर केलं. या मालिकेतल्या पहिल्या सामन्यात अश्विननं भारताचं प्रतिनिधीत्व केलं होतं. या सामन्यात त्यानं ५३ धावांत १ गडी बाद केला. हाच त्याच्या कारकिर्दीतला अखेरचा कसोटी क्रिकेट सामना ठरला. ६ नोव्हेंबर २०११ रोजी वेस्ट इंडिजविरोधात दिल्ली इथं झालेल्या कसोटी सामन्यात पदार्पण केल्यानंतर, अश्विननं आतापर्यंत १०६ कसोटी क्रिकेट सामन्यांत भारताचं प्रतिनिधीत्व करत ५३७ बळी घेतले आहे. कसोटी क्रिकेटमध्ये अनिल कुंबळे पाठोपाठ भारताच्या वतीनं सर्वाधिक बळी घेणारा दुसऱ्या क्रमांकाचा गोलंदाज आहे. याशिवाय त्यानं कसोटी क्रिकेटमध्ये ६ शतकं आणि १४ अर्धशतकंही झळकावली आहेत. त्यानं ११६ आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामन्यांमध्ये १५६ तर टी ट्वेंटी सामन्यांमध्ये ७२ बळी घेतले आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतरही आपण व्यावसायिक टी ट्वेंटी क्रिकेट खेळत राहणार असल्याचं अश्विननं जाहीर केलं आहे.

**<><><><>**

आमिर खान निर्मित आणि किरण राव दिग्दर्शित 'लापता लेडीज' हा चित्रपट ऑस्कर पुरस्काराच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. हा चित्रपट ९७व्या अकादमी पुरस्कारासाठी बेस्ट इंटरनॅशनल फीचर गटामध्ये भारताकडून अधिकृत रीत्या पाठवण्यात आला होता. मात्र अंतिम १५ चित्रपटांच्या यादीत या चित्रपटाचा समावेश होऊ शकला नाही. हिंदी भाषेत चित्रीत केलेल्या ब्रिटीश-भारतीय 'संतोष' या चित्रपटानं १५ चित्रपटांच्या यादीत स्थान मिळवलं आहे. पण, हा चित्रपट ब्रिटनकडून सादर होत आहे. ऑस्कर पुरस्कार सोहळा २ मार्च २०२५ ला होणार आहे.

**<><><><><>**

स्लोव्हेनिया इथं झालेल्या १८ वर्षांखालच्या जागतिक फिडे स्पर्धेत, भारताचा बुद्धिबळपटू ग्रँडमास्टर प्रणव व्यंकटेश यानं युवा रॅपिड आणि ब्लिट्झ या दोन्ही स्पर्धांचं विजेतपद पटकावलं. रॅपिड प्रकारात त्यानं साडेनऊ गुणांची कमाई करत सुवर्णपदक पटकावलं. या प्रकारात त्याचा रशियाचा प्रतिस्पर्धी अलेक्झांडर यानं ९ गुणांसह रौप्य, तर युक्रेनच्या रोमन यानं साडेसात गुणांसह कांस्य पदक पटकावलं.

ब्लिट्झ प्रकारात प्रणवनं एक फेरी शिल्लक असताना साडे एकोणीस गुणांसह सुवर्णपदकाची कमाई केली. या प्रकारात त्याचे रशियाचे प्रतिस्पर्धी दिमित्री यानं साडेपंधरा गुणांसह, तर अलेक्झांडर यानं कांस्य पदक जिंकलं.

**//<><><><><>//**